# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक ११ वा ❑ शुक्रवार दि.०७ फेब्रुवारी २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

### इतिहासाचे ‘विकृतीकरण’ आणि स्वतःच्या विचारधारेचे ‘उदात्तीकरण

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल



ज्योतिर्मय साहित्य

महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून महापुरुषांचा अवमान आणि अपमान होईल अशा अनेक घटना घडत आहेत. इतिहासाचे ‘विकृतीकरण’ आणि स्वतःच्या विचारधारेचे ‘उदात्तीकरण करण्याचा घाट सध्या घातला जात आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाबद्दल चुकीच्या गोष्टी सांगितल्या जात आहेत. छत्रपती शिवाजी महाराज फक्त आपल्या महाराष्ट्रासाठी नाही तर अख्या देशाचं दैवत आहे मात्र, शिवाजी महाराजांच्या आग्र्याहून सुटकेबाबत, मुख्य प्रवाहापासून काहिसे दूर गेलेले अभिनेते राहुल सोलापुरकर यांनी अतिशय घृणास्पद वक्तव्य केले आहे. छत्रपती शिवाजी महाराज चक्क लाच देऊन आग्र्यातून सुटून आले होते. असं राहुल सोलापूरकर यांनी म्हंटल आहे. त्यामुळे नव्या वादाला तोंड फुटलं त्यांच्यावर जोरदार टीका झाली. यानंतर राहुल सोलापूरकर यांनी सोशल मिडियावर जाहीर माफी मागितली. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या दैदिप्यमान कारकिर्दीत अनेक मोहिमा फत्ते केल्या. त्यातीलच यांच्या आग्र्यातला सुटकेचा प्रसंग इतिहासात अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. आपल्या बुद्धिचातुर्याच्या जोरावर त्यांनी शिताफीने आग्रा येथून आपली सुटका करून घेतली. पण याबाबत एका अभिनेत्याने महाराज लाच देऊन सुटले असं म्हणत वादग्रस्त वक्तव्य करत नवीन जावई शोध या महाशयांनी लावला.

बुद्धिचातुर्य, धैर्य, गनिमा कावा या गुणांनी आणि महाराजांच्या डावपेचांनी स्वराज्याला नेहमीच शत्रुंपासून सुरक्षित ठेवलं. आग्र्यात औरंगजेबाने महाराजांना कैदेत ठेवलं. मात्र, महाराज पेटाऱ्यात बसून सफाईदारपणे बाहेर पडले. महाराजांच्या आयुष्यात घडलेल्या घटना आजही अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी आहेत. त्यामुळे अशी बेताल वक्तव्य करणाऱ्यांनी एकदा इतिहास जरूर वाचावा.

स्वतःला चर्चेत राहण्यासाठी, स्वतःची प्रसिध्दी मिळविण्यासाठी काही महाशय नव-नवीन बेताल वक्तव्य करून इतिहासाची तोडमोड करत स्वतःचे उदात्तीकरण करत असतात. बनावट कथा, तथ्ये आणि डेटा शिकवून इतिहास बदलणे हे विशिष्ट विचारसरणी आणि अजेंडा वाढवण्याचे एक साधन आहे. हे घडलेच नाही अशा घटना निर्माण करून, घडलेल्या घटना बदलून किंवा घटना पूर्णपणे वगळून साध्य करण्याचा हा घाट सध्या मोठ्या प्रमाणावर रचला जात आहे. स्वतःचा उदो उदो करायचा आणि इतिहास बदलून टाकण्याचे श्रेय घ्यायचे असा प्रकार काही विकृतांकडून सध्या सुरू आहे.इतिहास म्हणजे केवळ भूतकाळातील घटनाक्रम नसून, तो एक प्रेरणादायी आणि भविष्यातील वाटचालीचा ‘दीपस्तंभ’ आहे. तोच इतिहास जर खोटा आणि विकृत करून समाजमनावर बिंबवला गेला, तर राष्ट्र आणि धर्म यांची कधीही भरून न येणारी हानी होऊ शकते, याची जाणीव विकृतीकरण करणाऱ्यांनी ठेवायला पाहिजे. इतिहास म्हणजे प्रत्यक्ष वास्तव. इतिहास हा इतिहासच असतो. या इतिहासाचे सादरीकरण जसेच्या तसे करणेच आवश्यक असते. इतिहासाला पालटण्याचा प्रयत्न केल्यास ती एक विकृतीच बनते. कलेच्या नावाखाली तुम्ही इतिहासाचे भांडवल बनवायचा प्रयत्न कराल, तर तुम्हाला समाजविरोधाला नक्कीच सामोरे जावे लागते. जसे सोलापूरकर यांना विरोधाला सामोरे जावे लागत आहे.. संपूर्ण राज्यात त्यांच्या वक्तव्याचा निषेध होत आहे. महापुरुषांची बदनामी करणाऱ्यांच्या विरोधात कठोर कायदे करणे आवश्यक आहे. जेणेकरून कोणीही अशा प्रकाराचे कृत्य करणार नाही.

# शिक्षक साहित्यसंमेलन, साहित्यामुळे जीवन प्रेरणा मिळते– जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

ज्योतिर्मय साहित्य

**छत्रपती संभाजीनगर –** साहित्य हे जीवन प्रेरणा देण्यासाठी खूप उपयुक्त असते. त्यातून मनावर संस्कार होतात. असे मनावर प्रेरणा करुन शिक्षणाचा संस्कार देणारे साहित्य निर्माण व्हावे,असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज एमआयटी येथे केले. दुसरे शिक्षक साहित्य संमेलन एमआयटी महाविद्यालयाच्या मंथन सभागृहात आयोजित करण्यात आले. संमेलनाचे उद्घाटन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते करण्यात आले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, संमेलनाध्यक्ष आशा खडतरे-डांगे, मावळते अध्यक्ष डॉ. हबीब भंडारे, जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथ.) वंदना चव्हाण, जिल्हा शिक्षणाधिकारी(माध्य.) आश्विनी लाटकर, शिक्षणाधिकारी (योजना) आशा भुमकर, जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था प्राचार्य देशमुख, एमआयटी चे संचालक मुनिश शर्मा आदी उपस्थित होते.



दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, शिक्षकांसाठी होणारे हे साहित्य संमेलन हे काळाची गरज आहे. शिक्षकांमधील साहित्यिकाला वाव देण्याची गरज आहे. शिक्षक हा समाज घडवणारा व्यक्ती असतो. आपण ज्या क्षेत्रात कार्य करीत आहात त्याचे सोने करावे. समाजाचा साहित्याशी संबंध दूर होत चालला आहे. त्यासाठी वाडमयाचा अभ्यास करणे आवश्यक आहे. हे संस्कार विद्यार्थी दशेत करण्याची गरज असून ते कार्य केवळ शिक्षकच करु शकतात. कविता, गितांद्वारे हे भाषेचे संस्कार आपण विद्यार्थ्यांवर करुन त्यांच्यामध्ये वाचन प्रेरणा निर्माण करावी. जेणे करुन वाचन संस्कृतीचे संवर्धन होईल. साहित्यामुळे जीवनप्रेरणा निर्माण होते. सकारात्मक बदलाची सर्व प्रेरणा ही साहित्यातून मिळते. प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत साहित्य पोहोचू शकते, त्यादृष्टीने अशा साहित्यसंमेलनांची गरज आहे.

जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना यांनी सांगितले की, शिक्षकांनी स्वतः मधील कलागुणांचा वापर मुलांना घडविण्यासाठी करावा. त्याद्वारे शिक्षणाची गुणवत्ता वाढवावी. त्यादृष्टीने शिक्षक साहित्य संमेलनाचे महत्त्व अधोरेखित होते. अजूनही यात खूप काम करण्याची गरज असून मुलांमध्ये वाचन संस्कृती रुजविण्यासाठी याचा अधिक वापर शिक्षकांनी करावा. आपल्या जिल्ह्यातून विविध स्पर्धांमध्ये वा शैक्षणिक यश संपादन करुन राष्ट्रीय राज्यस्तरिय पातळीवर गेलेल्या विद्यार्थ्यांच्या शिक्षकांचे अनुभव हे इतर शिक्षकांनी जाणून घ्यावे. जिल्ह्यात शिक्षणाच्या क्षेत्रात माहिती तंत्रज्ञानाचा वापर करुन विद्यार्थी घडविण्याचे काम सुरु आहे. विशेष म्हणजे त्यात पालकांचाही तितकाच सहभाग आहे,असेही मीना यांनी सांगितले. रमेश ठाकूर यांनी सुत्रसंचालन तर गीता तांदळे यांनी आभार मानले.

# प्रख्यात क्रिकेट समीक्षक द्वारकानाथ संझगिरी यांचे निधन


ज्योतिर्मय साहित्य

**मुंबई–** प्रख्यात क्रिकेट समीक्षक द्वारकानाथ संझगिरी यांचे काल दीर्घ आजाराने निधन झाले. ते ७४ वर्षांचे होते. संझगिरी यांनी मुंबईतील लीलावती रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला. ते बऱ्याच दिवसांपासून आजारी होते. त्यांच्या निधनाने क्रीडा क्षेत्रातून हळहळ व्यक्त केली जात आहे. द्वारकानाथ संझगिरी यांच्या पार्थिवावर आज शुक्रवारी दुपारी १२ वाजता शिवाजी पार्क स्मशानभूमीत अंत्यसंस्कार होतील.

संझगिरी यांनी मराठी भाषेत क्रिकेट लेखनाच्या माध्यमातून क्रिकेटप्रेमींना वेगळ्या शैलीत हा खेळ समजावून सांगितला. त्यांचे हलक्याफुलक्या शैलीतील लेखन आणि समालोचन चाहत्यांना नेहमीच भावत राहिले. सिव्हिल इंजिनियरिंगचे शिक्षण घेतलेल्या संझगिरी यांनी मुंबई महापालिकेत उच्च पदावर काम केले, मात्र क्रिकेटवरील प्रेम आणि लेखनकौशल्यामुळे ते लोकप्रिय समीक्षक झाले. द्वारकानाथ संझगिरी यांचा जन्म मुंबईत दादर येथील हिंदू कॉलनीत झाला. त्यांचं शालेय शिक्षण किंग्ज जॉर्ज तर महाविद्यालयीन शिक्षण रामनारायण रुईयामध्ये झालं. यानंतर व्हीजेटीआयमधून त्यांनी सिव्हिल इंजिनिअरिंगचं शिक्षण पूर्ण केलं.

क्रीडा क्षेत्रातील समीक्षणाबरोबरच संझगिरी यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेत अभियंता म्हणून नोकरी केली. २००८ मध्ये ते मुख्य अभियंता आणि त्यानंतर पाणीपुरवठा प्रकल्प म्हणून सेवानिवृत्त झाले. नव्वदच्या दशकाच्या उत्तरार्धापासून संझगिरी एकपात्री स्टँडअप टॉक शो करत आहेत आणि त्यांनी आजपर्यंत हजाराहून अधिक असे कार्यक्रम केले आहेत. द्वारकानाथ संझगिरी यांनी १९७० च्या उत्तरार्धात त्यांनी आपल्या लेखन कारकीर्दीला सुरुवात केली होती.

भारताने १९८३ चा वर्ल्ड कप जिंकल्यानंतर संझगिरी यांनी एकच षटकार हे पाक्षिक क्रीडा मासिक सुरू केले होते. याचे ते संपादक होते. फेसबूकवरही ते क्रिकेट आणि चित्रपटांविषयी लिहायचे, हे लिखान युवा पिढीला खूप आवडायचे. द्वारकानाथ संझगिरी स्तंभलेखनासोबतच प्रवास, सामाजिक समस्या, क्रीडा आणि चित्रपट अशा विविध विषयांवर ४० पुस्तके लिहिली आहेत.



## लक्षवेधी छायाचित्र....



कसा वाटला माझा पोझ.....

(छाया-भीमराज सातदिवे छ. संभाजीनगर )

## डॉ. जगदीश कदम यांना विधान परिषदेत घेण्याचा ठराव संमत

### साहित्य संमेलनात एकूण सोळा ठराव सर्वानुमते मंजूर; चौथे जनसंवाद ग्रामीण साहित्य संमेलन

ज्योतिर्मय साहित्य

**नांदेड –** येथील सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. डॉ. जगदीश कदम यांना मराठी साहित्यातील महत्वपूर्ण योगदानाबद्दल महाराष्ट्र विधानपरिषदेचे सदस्य म्हणून संधी देण्यात यावी, अशा मागणीचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. येथील सप्तरंगी साहित्य मंडळाचे चौथे जनसंवाद ग्रामीण साहित्य संमेलन सप्तरंगी साहित्य मंडळ आणि प्रज्ञादर्शन शिक्षण संस्था मुदखेड यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच संपन्न झाले. या संमेलनाच्या समारोप सत्रात एकूण सोळा ठराव मंजूर करण्यात आले. या ठरावांचे वाचन सप्तरंगी साहित्य मंडळाच्या वतीने करण्यात आले. यावेळी स्वागताध्यक्ष प्रविणदादा गायकवाड, निमंत्रक प्रल्हाद हिंगोले, सप्तरंगी साहित्य मंडळाचे संस्थापक अध्यक्ष अनुरत्न वाघमारे राज्याध्यक्ष नागोराव डोंगरे उपाध्यक्ष पांडुरंग कोकुलवार, कार्याध्यक्ष प्रज्ञाधर ढवळे, राज्य सचिव कैलास धुतराज, कोषाध्यक्ष शंकर गच्चे, जिल्हाध्यक्ष रणजित गोणारकर, महिला विभाग प्रमुख रुपाली वागरे वैद्य, दत्ताहरी कदम, प्रकाश ढवळे नागलगांवकर, बी. जी. कळसे, गौतम कांबळे आदींची उपस्थिती होती. चौथ्या जनसंवाद ग्रामीण साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपद डॉ. जगदीश कदम यांनी भुषविले. या निमित्ताने त्यांना विधानपरिषदेवर घेण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. तसेच साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्कार देऊन गौरव करण्यात यावा. तसेच म. फुले आणि सावित्रीमाई फुले यांनीही भारतरत्न पुरस्कार द्यावा, भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त हर घर संविधान हा उपक्रम राबवून प्रत्येकाच्या घरी भारतीय संविधान राष्ट्रीय ग्रंथ म्हणून विनामूल्य देण्यात यावे, मराठी मुलखात बोलल्या जाणाऱ्या सर्वच बोलीभाषांना मराठी भाषेने सामावून घ्यावे, ग्रामीण मराठी साहित्य संमेलनास दरवर्षी विनाअट अनुदान मंजूर करण्यात यावे, नांदेड जिल्ह्याच्या जिल्हा नियोजन समितीने ग्रामीण साहित्य संमेलनाला निधी उपलब्ध करून द्यावा, ग्रामीण भागातील साहित्य चळवळ आणि साहित्यिकांच्या दर्जेदार साहित्याची साहित्य अकादमीने दाखल घ्यावी, वयोवृद्ध साहित्यिक, कलावंत याना विना अट रु. १०,००० मानधन द्यावे, बोली भाषेला प्रोत्साहन देण्यासाठी काही नवीन प्रकल्प हाती घ्यावेत. तसेच जिल्हा परिषद तथा मनपाच्या धर्तीवर जिल्हा व तालुक्याच्या ठिकाणी ग्रंथोत्सव भरविण्यात यावा, ग्रामीण भागातील माध्यमिक, उच्च माध्यमिक तथा पदवी महाविद्यालयांना साहित्य संमेलने भरविण्यास शासनाने उत्तेजन द्यावे, शेती मालाला हमी भाव जाहीर करावा आणि तो चार महिन्याच्या आत खरेदी करण्याची व्यवस्था करावी, सीमावर्ती भागातील मराठी भाषिकांना महाराष्ट्रात सामावून घेऊन प्रस्तावित नवीन जिल्ह्यांची व तालुक्यांची निर्मिती करावी, शक्य त्या उपाययोजना करण्यात याव्यात पण कोणत्याही परिस्थितीत मराठी माध्यमाच्या शाळा बंद करण्यात येऊ नयेत, न्यायालयासह सर्वच शासकीय, निमशासकीय कार्यालयातील कामकाज मराठीतूनच व्हायला हवे. दैनिक वृत्तरत्न सम्राटचे संपादक पत्रकार बबन कांबळे यांना मरणोत्तर पद्मश्री पुरस्कार देण्यात यावा असे ठराव सर्वानुमते समंत करण्यात आले






– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com

**आनंदी पहाट...**

## अंतर्मन अधिक महत्वाचं

**ज्योतिर्मय साहित्य**

व्यक्ती तितक्या प्रकृती, त्यामुळे एकाच कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीच्या आवडीनिवडी, सवयी, मानसिकता ही देखील भिन्न असते. ह्या भिन्न विभिन्न मानसिकतेचा विचार करून कुटुंबामध्ये एकता निर्माण करावी लागत असते. आपल्यासाठी आपलं सुप्तावस्थेत असणारं अंतर्मन अधिक महत्वाचं असतं. आपल्या विचार, वर्तन आणि व्यवहारांचा थेट परिणाम आपल्या अंतर्मनावर होत असतो. विचार, वर्तन आणि व्यवहार सकारात्मक पातळीवर अंतर्मनावर कोरले गेले तर यशप्राप्ती सहज साध्य आणि शक्य होत असते. याउलट नकारात्मक विचार, वर्तन आणि व्यवहार या सर्वांमुळे अंतर्मनाला दु:ख आणि एकूणच आपल्या वाट्याला अपयश येतं. आपल्या दृष्टिकोनावर आपले अनुभव संचित होत असतात. हे अनुभव सुख-दु:खाचे म्हणजेच संमिश्र स्वरूपाचे असतात. प्रत्येकाच्या विचारांप्रमाणे आवडी-निवडी, अपेक्षा, गरजा, शारीरिक व्यक्तिमत्व हे निराळं असतं. त्याप्रमाणे त्याला साजेसं, शोभेल असं घरातील वातावरण असणं अथवा ते निर्माण करणं निश्चितच उपयोगाचं ठरतं.

अनेकदा दु:ख अधिक आणि सुख मात्र अगदी थोडं आपल्या वाट्याला आलं असल्याचं म्हंटलं जातं. खरं तर, जसा चष्मा लावावा तसंच दिसतं. प्रत्येक विषयाकडे आपण कसं पाहतो त्यानुषंगाने आपलं वैचारिक मंथन सुरु होत असतं. सर्वप्रथम बाह्यमन त्याचा विचार करायला लागतं आणि त्याच वेळी आपल्या सुप्त अंतर्मनावर प्रत्येक विषय प्रतिबिंबित होत राहतो. मग क्रिया आणि प्रतिक्रियांचा खेळ सुरु होतो. अंतर्मनावर प्रतिबिंबित झालेले प्रत्येक विचार आपल्या वर्तन आणि व्यवहारांमध्ये परिवर्तन करत राहतात. अनेकदा मनांत येणारे विचार आपल्या गत अनुभवांशी निगडीत असतात तर ते काहीवेळा नजीकच्या भविष्यात काय, कसं आणि कधी घडावं ? याबद्दलचे असतात. आयुष्याच्या अवघड शाळेत आपण कोणत्या वर्गात आहोत, परीक्षा कोणती आहे हे ठाऊक असतंच असं नाही; कॉपी करता येत नाही कारण प्रत्येकाची प्रश्नपत्रिका वेगळी असते.

## श्रीपाद वल्लभ दिगंबरा...


**ज्योतिर्मय साहित्य**

**(मागील अंकावरून)**


सुमतीला मग दारी आलेल्या अतिथीचे बोल आठवले. हा मुलगा जास्त काळ तुमच्याजवळ थांबणार नाही.

तिच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले. ती म्हणाली, बाळ, तू आम्हाला असेच दु:खी कष्टी ठेवून जाणार का ? तुझे दोन भाऊ हे असे. एक अंध तर दुसरा अपंग. म्हातारपणी आम्ही कोणाकडे पाहावे ?

श्रीपाद म्हणाला, आई, काळजी करू नकोस. तुम्हाला दु:खात ठेवून मी जाणार नाही. श्रीपाद आपल्या अंध भावाजवळ गेला. त्याच्या डोळ्यांवरून त्याने हात फिरवला. श्रीपादचा हात फिरताच त्याला दृष्टी आली. दुसऱ्या भावाच्या अंगावरूनही त्याने



हात फिरवला. तो काय आश्चर्य ! त्याचे सर्व व्यंग नाहीसे झाले. आपल्या मुलांच्या या परिवर्तनामुळे आईच्या आनंदाला पारावर राहिला नाही. आपल्या दोन्ही भावांना श्रीपादने आशीर्वाद दिला. तुम्हाला पुत्रपौत्रांसह सर्वप्रकारची सुखसमृद्धी आणि दीर्घायुष्य प्राप्त होईल. तुम्ही चिरकाल सुखाने नांदाल. आपल्या आई-वडिलांची सेवा करा. तुम्ही परमज्ञानी व्हाल. शेवटी तुम्हाला मोक्ष प्राप्त होईल. मग ते आई-वडिलांना म्हणाले, ''या दोन्ही मुलांच्या सहवासात राहून तुम्ही शतायुषी व्हाल. आता मला परवानगी द्या. मी उत्तरदिशेला जात आहे. अनेक साधुजनांना मी दीक्षा देणार आहे. तुम्हाला काही कमी पडणार नाही. काळजी करू नका. असे म्हणून श्रीपाद आता आपल्या कार्यासाठी बाहेर





पडायला सिद्ध झाला.

एवढासा पोर ! पण निश्चय केवढा होता ! काषाय वस्त्र परिधान केलं. दंड धारण केला. हाती कमंडलू घेतलं आणि भिक्षेची झोळी खांद्याला अडकवली. आपल्या मातापित्यांना आणि आजूबाजूच्या ज्येष्ठांना वंदन करून श्रीपाद तीर्थयात्रेसाठी बाहेर पडला. मातापित्यांनी साश्रू नयनांनी त्याला निरोप दिला.

मजल दरमजल करीत श्रीपाद कृष्णेच्या काठी असलेल्या कुरवपूर इथे येऊन पोहोचला. पहाटे कृष्णेच्या पवित्र जलात स्नान करून जवळच असलेल्या एका औदुंबर वृक्षाखाली त्याची ध्यानधारणा सुरु झाली. श्रीपादश्रीवल्लभांचे रूप दिव्य होते. पायात दिव्य खडावा, कटीला कौपिन व मेखला, अंगावर काषाय वस्त्र हातात कमंडलू, गळ्यात रुद्राक्ष माळ, कपाळी भस्म, व मस्तकी जटाजुट धारण केलेली, कमळाप्रमाणे प्रफुल्लित नेत्र आणि सुहास्य वदन. श्रीपादप्रभूंची दया, क्षमा शमदमालंकृत भव्य मूर्ती ज्यांनी पाहिली ते सर्व लोक धन्य होत ! ते कृष्णामाईत त्रिकाल स्नान करीत असत. रोज प्रात:काळी संध्येत १००० गायत्री जपत तर सूर्यनारायणास १०८ नमस्कार घालीत.

त्यांची तेज:पुंज मूर्ती जेव्हा ग्रामस्थांनी पाहिली, त्यांची तपश्चर्या, चेहऱ्यावरील तेज आणि तरुण कोवळे वय पाहून ग्रामस्थांना हा कोणीतरी असाधारण तपस्वी असावा असे वाटले. लोक मोठ्या संख्येने त्यांच्या दर्शनासाठी येऊ लागले. पुष्पहार, नैवेद्य आणू लागले. त्यांना मात्र या कशाचाच लोभ नव्हता. पण त्यांच्या नुसत्या दर्शनाने लोकांना आनंद वाटू लागला. त्यांच्या बोलांनी त्यांच्या रोजच्या समस्यांवर त्यांना समाधान मिळू लागले. तो त्यांच्या जीवनाचा आधार झाला. रोज त्या ठिकाणी भगवंताचे भजन, पूजन, कीर्तन होऊ लागले. **(क्रमश:)**



**दासबोध स्तवन**



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## परमार्थ स्तवन

**ज्योतिर्मय साहित्य**

**(मागील अंकावरून)**

आत्मसात करून जीवनातील दु:ख नामषेश करणे हेच परमार्थाचे खरे स्वरूप आहे. परमार्थी व्यक्तीला प्रपंच खोटा वाटतो मायेचा पसारा केवळ कल्पनामय आहे असे वाटते आणि तेव्हाच विवेकाच्या सहाय्याने शुध्द आत्मस्वरूपाचे अंतर्यामी दर्शन घडते . आतबाहेर ब्रम्हदर्शन होण्याची अवस्था अंतर्यामी स्थिर झाली की सर्व संशय नाहीसे होतात. सात्विक सामान्य माणसाने संतसंगती धरली तर जीवनात विसावा मिळून समाधान लाभते.


अनेक जन्माचे पुण्य पदरी असेल तरच परमार्थ घडतो. अशा परमार्थाचे कार्य पुढील प्रमाणे आहे.

परमार्थच संसारातून निटपणे पार पडला जातो. म्हणजे संसारी व्यक्ती ला परमार्थ खुप महत्वाचा आहे. मनुष्य जन्माचे सार्थक परमार्थातुनच होते. आणि सुखाचा मार्ग दाखवतो. तापसांना आधार देतो. आश्रय देतो. भवसागरातुन बाहेर पडण्यासाठी मार्ग दाखवतो. ज्याला परमार्थ साधता आला तोच खरा राजा होय. परमार्थ करत नाही त्याला भिकारी समजावे . अनेक जन्माचे पुण्य पदरी असेल तरच हातुन परमार्थ घडतो. समर्थ सांगतात मनुष्य जन्माचे सार्थक करून घ्यायचे असेल तर परमार्थाच्या नादी लागावे. भगवत् भक्ती करून परमात्व स्वरूपाचा आनंद घ्यावा . आनंदाचे डोही आनंद तरंग.अशी अनुभुती घेऊन मानवी जन्म सार्थकी करावा व आपल्या कुळाचा ऊध्दार करावा.

श्री राम जय राम जय जय राम
जय जय रघूवीर समर्थ

परमार्थ स्तवनाचा अभ्यास करत असताना माझ्या लिखाणात काही अधिक ऊणे झाल्यास समर्थ मला माफ करतील.

**(क्रमश:)**



**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

## नाम व इतर साधने

**ज्योतिर्मय साहित्य**


नवविधा भक्तीचा श्रवण, कीर्तन, विष्णुस्मरण इत्यादि क्रम हा सृष्टिक्रमाला धरून आहे. मनुष्यप्राणी जन्माला आला की शिकायला सुरूवात करतो ती श्रवणापासूनच. मुके लोक बहिरे असलेच पाहिजेत, कारण श्रवण न झाल्याकारणानेच त्यांना बोलता येत नाही. मनुष्यप्राणी ज्या देशात जन्माला येतो त्या देशाची भाषा बोलतो. म्हणून श्रवणानंतर कीर्तन म्हणजे बोलणे; आणि बोलणे झाल्यानंतर कृती म्हणजे नामस्मरण असा स्वाभाविक क्रम लागतो. नामस्मरण होऊ लागले की आपले काम झाले कारण पुढल्या सर्व भक्ती नामस्मरणात येतात. त्यांच्याकरिता निराळी खटपट करण्याचे कारण नाही. एका इसमाला दुसर्या एकाला भेटण्यासाठी नऊ मैल अंतरावर असलेल्या ठिकाणी जायचे होते म्हणून तो घरातून निघाला. पण तीन मैल चालून गेल्यावर ज्याला भेटायचे होते तोच मनुष्य त्याला भेटला. अशा वेळी आपले काम झाले म्हणून तो जसा पुढे जाण्याच्या खटपटीत पडणार नाही, त्याचप्रमाणे तिसरी म्हणजे नामस्मरणभक्ती केल्याने पुढल्या सहाही प्रकारच्या भक्तींचे फळ मिळते.

भगवंताच्या स्मरणात सर्वस्व आहे ही अगदी खूणगाठ बांधून ठेवा. भगवंताचे स्मरण कसे आहे ? बाकी सगळ्या गोष्टी, सगळी सत्कर्मे, दानधर्म म्हणा, तीर्थयात्रा म्हणा, पारायण म्हणा, बाकीच्या सगळ्या गोष्टी ह्या इंद्रियांसारख्या आहेत. ही सगळी इंद्रिये मानली तर भगवंताचे स्मरण हा प्राण आहे. बाकीची सर्व इंद्रिये जरी असली आणि प्राण नसेल तर इंद्रियांचा काही उपयोग नाही. तेव्हा नामस्मरण हा प्राण समजून तुम्ही प्रपंचात सुखी राहा. कर्तव्याला चुकू नका, कर्तव्य करीत असताना परमात्म्याचे स्मरण राखा; मुखामध्ये राम असू द्या. भक्ताने उपाधी बेताची, म्हणजे गरजेपुरतीच ठेवावी. भगवंताचे अनुसंधान न चुकेल एवढीच उपाधी असावी. तसेच पचेल तेवढेच म्हणजे आनंदाने जेवढे करवेल तितकेच नामस्मरण करावे. ते कष्टाने करू नये कारण त्यापासून आनंद होणार नाही. नामात प्रेम येणे जरूर आहे, याकरिता ते नाम अत्यंत आवडीने आणि त्याच्याशिवाय दुसरे काही साधायचे नाही आहे अशा भावनेने घेतले पाहिजे, म्हणजे त्यात प्रेम येईल. नामात प्रेम येणे ही फार उच्च कोटीची स्थिती आहे. ती अगदी सहजासहजी प्राप्त होणारी नाही. म्हणून यातले मर्म ओळखून योग्य तर्हेने आणि चिकाटीने सतत नामस्मरणाचा अभ्यास ठेवणे जरूर आहे. भगवंताच्या नामाशिवाय मला काही कळत नाही असे ज्याला कळले त्याला सर्व कळले. नामस्मरणाची बुध्दी झाली की आपले काम

**संस्कृती व संस्कार**



विभावरी कुलकर्णी,
मो. ८०८७८१०१९७



## पशू पक्षी यांचा आदर करावा

**ज्योतिर्मय साहित्य**

आपण ज्या पृथ्वीवर रहातो तेथे मानव एकटाच नसतो. पृथ्वीवर जी जीवसृष्टी आहे त्यातील माणूस हा एक प्राणी आहे. माणूस बुध्दीने सर्वश्रेष्ठ असल्याने सर्वांच्या वरचढ ठरला आहे. तसे पाहिले तर इतर प्राण्यांच्या कडे जे आहे त्यातील काहीच माणसाकडे नाही. पण आपल्या बुद्धीच्या बळावर तो सर्वांना ताब्यात ठेवू शकतो. प्राण्यांच्या ठायी असलेल्या शक्ती माणूस मशिन द्वारे प्राप्त करतो. खरे तर सर्व पशू पक्षी निसर्गात महत्वाचे असतात. ते निसर्गाचा समतोल राखतात. त्यांच्या मुळे निसर्गाचे संवर्धन होते. या मुळे आपले जीवन समृध्द होते. निसर्गाचे चक्र अव्याहत चालू रहायचे असेल तर हे पशू, पक्षी, कीटक, वृक्ष, नद्या, डोंगर आवश्यक आहेत. परंतू हे लक्षात न घेता माणसाने आपल्या बुद्धीचा स्वार्थी व बेबंद वापर केला तर माणसाचीच सर्वात जास्त हानी होणार आहे. ज्या जीवसृष्टीच्या आधारे माणूस सुखात जगत असतो,ज्यांच्या आधाराने जगत असतो त्यांचे आपण ऋणी असले पाहिजे. ही साधी माणुसकी आहे.

या विषयी भारतीय संस्कृतीने उच्च आदर्श जपला आहे. श्राद्ध या कृतज्ञता विधीमध्ये धर्मपिंड दिले जाते. ते सर्व पशू, पक्षी, वृक्ष, नद्या, पर्वत ज्या सर्वांनी आपल्याला पोसले त्या सर्वांना हे धर्मपिंड असते.

कोणीही कितीही श्रेष्ठ असेल, बुद्धिवादी असेल तरी कोणालाही क्षुद्र म्हणून हिणवू नये, निंदा करू नये, लाथाडू नये. या निसर्गा पुढे नम्र व्हावे. आणि सर्वांच्या कल्याणासाठी प्रार्थना करावी.



**नीतिशतक निरूपण**

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

**ज्योतिर्मय साहित्य**


वरं पर्वतदुर्गेषु भ्रान्तं वनचरैः सह।
न मूर्खजनसम्पर्कः सुरेन्द्रभवनेश्वपि ।।

अर्थ –

मूर्ख लोकांसोबत स्वर्गात राहण्यापेक्षा वनेचरांसोबत पर्वतादि दुर्गम प्रदेशात भ्रमंती करणे श्रेष्ठ होय.

साधारणपणे स्वर्गलोक हा पृथ्वीलोकाहून श्रेष्ठ आहे, पृथ्वीलोक हा मर्त्य लोक आहे, असे म्हटले जाते. पण आपण जेथे राहतो, ते स्थान आपल्यासाठी सुखकारक आहे की नाही, हे त्या स्थानावर नव्हे; तर आपल्यासोबत कोण आहे, यावर अवलंबून असते. मूर्ख लोकांसोबत स्वर्गात राहण्यापेक्षा वनेचरांसोबत पर्वतादि दुर्गम प्रदेशात भ्रमंती करणे श्रेष्ठ होय; असे प्रतिपादन कविराज भर्तृहरींनी केले आहे.

**।। श्री स्वामी समर्थ ।।**



**ज्योतिर्मय साहित्य**

स्वामी म्हणतात – पावसाचे थेंब छोटे जरी असले तरी त्याचे सतत पडत राहणे हे एका मोठ्या नदीला जन्म देतात त्याच प्रकारे रोजचे पाठवलेले छोटे-छोटे सूविचार जीवनात मोठे परिवर्तन घडवू शकतात..

''सुख'' फुलासारखं असावं जे दररोज उमलत रहावं...
''दु:ख'' हे गळणाऱ्या पानासारखं असावं जे क्षणात निघून जावं...

स्वामी म्हणतात – समजूत घालायला कुणी नसलं की स्वत:लाच बळ आणावं लागत !! ज्यांचे डोळे चांगले ते जगाच्या प्रेमात पडतात, पण ज्यांची जीभ गोड असेल तर जग त्यांच्या प्रेमात पडते...! एक व्यक्ती म्हणून मोठं होताना, कधीही माणूस म्हणून छोटे होऊ नका...



**आरोग्य संजीवनी**

## खाणे : एक अभ्यास !

You are what you eat अशी एक म्हण आहे. म्हणजे तुम्ही जे खाता तसे असता. आसपासच्या समुदायावर सहज नजर टाकली तरी कळेल कोण काय खात असेल ते. कमरेच्या पट्ट्याबाहेर येवू पाहणारं पोट समोर आलं की आतले वडापाव, समोसे दिसू लागतात. गावाकडनं आलेला, कष्टाने राबलेला चेहेरा दिसला की त्याच्या चुलीवरची ज्वारीची भाकरी समजून घेता येते, कपाळावरच्या घामातनं वाहून जाणारा अंगारा टिपता आला तर इडली / डोशाचा अंदाज येतो, आपली चाळीशी लपवू पाहणाऱ्या एखाद्या ललनेच्या चेहऱ्यावरचं डाएटचं प्रेशर आणि सतत उकडलेल्या भाज्या खाऊन आलेला कंटाळा सहज लक्षात येतो. याचा अर्थ इतकाच की आपलं व्यक्तिमत्त्व आपल्या जिव्हाल्यावरचं नियंत्रण वा त्याचा अभाव यावर अवलंबून असतं.

थोडक्यात बोलणं असेल वा खाणं जिभेवरचं नियंत्रण हे नेहमीच उपयोगी असत. हे आता मोठ्या प्रमाणावर कळायला लागलंय अनेकांना त्यामुळे हे असं कळणारे खाण्याबाबतीत कमालीचे चोखंदळ झालेत. कोणी कार्बघटक (पिष्ठमय पदार्थ) खातंच नाही, कोणी फक्त प्रथिनेच (प्रोटीन) खातं, आणखी कोणी शनिवार/रविवार खाण्यावर आडवा हात मारतं आणि मधले दिवस उपासतापासात घालवतं.



परंतु योग्य आणि प्रमाणात खाणे कसे ठरवायचे हे मात्र कोडेच बनून राहते. मग खावे काय ?


सहज आणि सोप्या भाषेत सांगायचं झालं तर आपल्या प्रदेशात उगवणारे (मिळणारे) पदार्थ खाणे हे त्या त्या प्रदेशातील व्यक्तींना फायद्याचे ठरते. तसेच ते त्या त्या ऋतूमधील असणे आवश्यक आहे. निसर्गाने ते त्याप्रमाणे प्रस्तुत केलेले असते. त्यामुळेच ते आरोग्यासाठी हितकारक असते. जसे आंबे उन्हाळ्यातच, जांभूळ पावसाळ्यातच खाणे हितकारक ठरते.


त्या त्या ऋतूनुसार व त्या त्या प्रदेशानुसार आपला आहार घेणे गरजेचे असते.

****

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

# रवींद्रनाथ टागोर





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

त्यांच्या सूक्ष्म निरीक्षणातून त्यांच्या असं लक्षात आलं की ही दरी इंग्रजी शिक्षणातून निर्माण झाली आहे. इंग्रंजांच्या सभ्यतेच्या कल्पना आणि त्यालाच सर्वस्व मानून त्याचे अनुकरण करणारा शहरी वर्ग या गोष्टी लोकांमधील दुरावा वाढवण्यास कारणीभूत आहेत. ग्रामीण भागातील लोक आपल्या बोलीभाषेत बोलत असतील, ते भलेही अशिक्षित असतील पण त्यांच्याजवळही बुद्धिमत्ता आणि प्रतिभा यांची कमी नाही हे त्यांनी जाणले. माणसातील शहाणपणा केवळ पुस्तकी शिक्षणाने येत नाही. ग्रामीण भागातील लोक अशिक्षित, ग्राम्य भाषा बोलणारे असतील पण त्यांच्याजवळ अनुभवाने आलेले शहाणपण नक्कीच होते. ग्रामीण साहित्यात तर त्यांना साहित्यातील अभिजात सौंदर्याचे दर्शन घडत होते. ग्रामीण लोककला, साहित्य किती समृद्ध आहे हे त्यांनीच प्रथम साहित्यिकांच्या आणि जाणकारांच्या लक्षात आणून दिले. कोलकात्यातील तथाकथित शिक्षित लोकांच्या दृष्टीने लोकगीते म्हणजे अडाण्यांची गाणी होती. परंतु त्यातील प्रतिभा आणि सौंदर्य रवींद्रनाथांनी सर्वसामान्य लोकांच्या लक्षात आणून दिले ही त्यांची मोठीच कामगिरी होती.

जीवनाच्या सर्व बाजूंचा, अंगांचा विचार त्यांनी केला. केवळ अर्थार्जनासाठी उपयोगी पडणारे, जीवनाच्या आणि व्यवहाराच्या दृष्टीने उपयुक्त असणारे शिक्षण त्यांना मान्य नव्हते. ज्ञान म्हणजे केवळ पुस्तकी शिक्षणातून मिळणारी कोरडी माहिती नव्हे हे त्यांच्या लक्षात आले होते. खरे ज्ञान तेच की ज्यामध्ये मनुष्याच्या ज्ञानेंद्रिये आणि कर्मेंद्रिये यांचा सुरेख संगम होतो. केवळ बुद्धीच नव्हे तर सारी इंद्रिये चैतन्यमय होतात. **(क्रमशः)**

# विवाह समुपदेशन ही काळाची गरज

ज्योतिर्मय साहित्य

आपल्या भारतीय विवाह संस्थेला जागतिक पातळीवर विशेष महत्त्व प्राप्त आहे. भारतीयांमधील विवाहबंधनाला एक पवित्र नाते मानले जाते. भारतात वैवाहिक संबंध हे केवळ दोन व्यक्तीमधील न मानता दोन कुटुंबातील संबंध असे मानले जातात. पाश्चिमात्य देशासारखे विवाह म्हणजे एक करार ही संकल्पना भारतीय संस्कृतीमध्ये नाही. मात्र तंत्रज्ञान आणि आधुनिक समाज व्यवस्था यामुळे नातेसंबंधाचे स्वरूप दिवसेंदिवस बदलत आहे.

आज इंटरनेटच्या माध्यमातून फेसबुकवरूनही विवाह जमवला जात आहे. तसेच मॅरेज ब्युरोमार्फत ऑनलाईन स्थळे सुचवण्याचा जमाना आहे; परंतु त्याचे जसे फायदे आहेत, तसे तोटेही आहेत, हे वधू-वरांच्या पालकांनी लक्षात घ्यायला हवे. सध्या घटस्फोटाचे प्रमाण खूपच वाढत आहे. अगदी क्षुल्लक कारणांवरून, पती-पत्नीतील किरकोळ मतभेदांमुळेदेखील जोडपी न्यायालयात घटस्फोटासाठी धाव घेताना दिसतात. या पार्श्वभूमीवर विवाह समुपदेशन ही काळाची गरज झालेली आहे.

एखादा कौटुंबिक अगर वैवाहिक वाद जेव्हा कोर्टात जातो, तेव्हा त्याला वेगळेच स्वरूप प्राप्त होते, तो वाद खासगी राहात नाही. कोर्टासमोर पती-पत्नी एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करीत राहतात. कोर्टात त्याची नोंद होत राहते. आणि नाती इतकी दुभंगतात की, कधीही न जुळणारी बनतात. घटस्फोटांच्या वाढत्या प्रमाणामुळे त्यास सामाजिक समस्येचे स्वरूप प्राप्त झाले आहे. वैवाहिक संबंध दृढ, आपुलकीचे आणि



प्रेमाचे ठेवण्यासाठी लग्नापूर्वी विवाहपूर्व समुपदेशन आणि लग्नानंतर पुन्हा समुपदेशन याची गरज भासत आहे. लग्नाआधी एकमेकांतील न दिसलेले गुण-दोष जोडप्यांना लग्न होऊन मधुचंद्रानंतर स्पष्ट दिसू लागतात व जोडीदारास दोषांसोबत स्वीकारण्याची मनाची तयारी नसल्याने संबंध टोकास जातात, कधीही न जुळणारे बनतात. त्यामुळे जोडीदार निवडताना आणि निवडल्यानंतर विवाहपूर्व समुपदेशनसुद्धा आजच्या काळात आवश्यक झाले आहे.

विवाहपूर्व समुपदेशनामुळे जोडीदारांना विवाहापूर्वीच एकमेकांना समजून घेण्यास मदत होते व भविष्यातील गुंतागूंत अथवा मतभेदांना अगोदरच फाटा देता येतो. संस्कारातील अंतर व मतभेद यांचे प्रमाण खालच्या पातळीवर आणण्यात मदत होते. तसेच विवाहापूर्वी वधू-वर आपल्या अपेक्षा एकमेकांसमोर उघड न करता एकमेकांपासून काही अपेक्षा ठेवून असतात व त्या अपेक्षा विवाहानंतर पूर्ण झाल्या नाहीत की नात्यामधील गोडवा संपून वाद-विवाद वाढतात. विवाहपूर्व समुपदेशनामुळे जोडीदारांना एकमेकांकडून विवाहानंतरच्या अपेक्षा, आवड-निवड याबाबत उघडपणे बोलण्यास व्यासपीठ प्राप्त होते.

विवाहानंतरचे समुपदेशन तर अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते. नवरा-बायकोमधील तुटू पाहणारे नाते योग्य वेळी समुपदेशनाच्या माध्यमातून पुन्हा एकजीव होते. फॅमिली कोर्टामध्ये धाव घेण्यापूर्वीही जोडप्यांना काऊन्सेलिंगद्वारे समजवण्याचा प्रयत्न केला जातो. विवाह समुपदेशनाच्या माध्यमातून पती-पत्नीच्या दरम्यानच्या समस्यांचा अभ्यास केला जाऊन त्याबाबत योग्य तो आणि परिणामकारक सल्ला दिला जाऊ शकतो. विवाह समुपदेशनाच्याद्वारे पती-पत्नीमधील भांडणाचे मूळ शोधून तसे प्रसंग टाळण्याबाबत मार्गदर्शन मिळू शकते. मुलांचे संगोपन आणि त्यांच्या भविष्याच्या जबाबदारीची जाणीव जोडप्यांना करून दिली जाते. त्यामुळेही जोडप्यांना घटस्फोट घेण्यापासून परावृत्त करता येणे शक्य होते. विवाहपूर्व समुपदेशनाद्वारे योग्य मार्गदर्शनामुळे मानसिक स्थिती, स्वभाव लक्षात घेऊन योग्य सल्ला दिला जाऊ शकतो. तसेच लग्नानंतरच्या समुपदेशनाने दोन कुटुंबांतील तुटणारे रेशीमबंध पुन्हा साधण्याचे पवित्र कार्य होते. त्यामुळेच विवाह समुपदेशन ही काळाची गरज आहे, यात शंका नाही.




उद्धव भयवाळ
छत्रपती संभाजीनगर
मोबाईल-८८८८९२५४८८

# काय म्हणतील लोक..!

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)




यातच कवी नीरज यांनी आपले दुःख का म्हणून कोणाला सांगावे म्हणतात बरेचदा असही होतं की, ज्या माणसाला आपण, आपले दुःख आपुलकीने सांगण्याचा प्रयत्न करत असतो. पण, त्याचे परिणाम उलट आपल्यालाच भोगावे लागतात कारण दुःख समजून घेणारा माणूस आपल्याच विचाराचा असेलच असेही नाही म्हणून आपले दुःख कोणाला सांगताना आधी त्या माणसाला वाचणे गरजेचे असते. काही दुःख असेही असतात की, खूप काही शिकवण देऊन जातात मात्र त्या दुःखाला कंटाळून आपण चुकीचा मार्ग अवलंबून जगत असतो त्यावेळी दुःख सुद्धा माणसावर नाराज होत असतो. खऱ्या अर्थाने दुःखातूनच सुखाची प्राप्ती होत असते हे फुकटच नाही. या कवितेतून कवी नीरज खूप काही सांगून जातात.

मैत्री या नात्याला पवित्र मानले गेले आहे म्हणून आजही भगवान श्रीकृष्ण आणि गरीब सुदामा या दोघांच्या मैत्रीचा आदर्श घेतला जातो. कारण या दोघात गरीब, श्रीमंत किंवा जातीभेद नव्हता तर एक माणुसकी होती आणि स्नेह होता म्हणून आज त्यांची मैत्री पुज्यनीय आहे सोबतच त्यांच्या मैत्रीला वंदन केले जाते अशी मैत्री जर आजच्या या काळात असेल तर मैत्री सारखं पवित्र नातं कायम टिकून राहील पण, आजकाल या मैत्री नात्याला सुध्दा कलंक लागलेला दिसून येत आहे. मैत्री ही कोणासोबत केली पाहिजे, कशाप्रकारे निभावून दाखवली पाहिजे, या विषयावर मैत्री या शीर्षकावर आधारित कवी नीरज आत्राम यांनी फारच सुंदर कविता लिहिली आहे.

नको नुसता देखावा भ्रम मैत्री असावी विश्वासाची
मैत्री असावी परिसासारखी लोखंडालाही सोनं बनविणारी

आज खऱ्या अर्थाने अशा मैत्रीची गरज आहे तेव्हाच मैत्री सारखं नातं कायम जुळून राहील. मैत्री सारख्या नात्यात दिखावूपणा असेल तर ती मैत्री धोक्यास कारण ठरत असते, ज्या मैत्रीत स्वार्थ असेल तर ती मैत्री दुःखास कारण ठरत असते आणि ज्या मैत्रीत कुटनिती असेल तर ती मैत्री संपूर्ण कुळाचा नाश करत असते. म्हणून कोणासोबत मैत्री करताना आधी त्या माणसाला वाचणे गरजेचे असते.मैत्री जर पुस्तकांशी केली तर त्यातून ज्ञान मिळत असतो,मैत्री स्वतःशी केल्यावर स्वतःची ओळख पटत असते, मैत्री झाडांशी केली तर त्या झाडांचे संघर्ष, त्याग कळत असतो कारण हे निःस्वार्थी असतात. त्यांना फक्त द्यायचे माहीत असते घ्यायला ते शिकले नसतात. कारण मैत्रीत विश्वास असावा, दिखावूपणा नाही. म्हणून मैत्री त्यांच्याशी आवर्जून करावा. जेथून मैत्रीसारखं नातं कायम टिकून राहील. कवितेतून मैत्री कशी असते कवी नीरज आत्राम यांनी फार सुंदर ओळी लिहिलेल्या आहेत. सर्वच कविता वाचनीय आहेत. समोरही असेच अनेक साहित्य प्रकार कवी नीरज आत्राम यांच्या हातून लिहिले जावे यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा देते.



पुस्तक परीक्षण

सौ.संगीता संतोष ठलाल
मु. कुरखेडा जि. गडचिरोली
मो. ७८२१८१६४८५

हा काव्यसंग्रह नक्कीच वाचकांना आवडेल यात काही शंका नाही.

काव्यसंग्रहाचे नाव:-काय म्हणतील लोक

कवी: -नीरज आत्राम आचल, वसंत नगर, सरदार पटेल चौक, वरोरा जि.चंद्रपूर मो.नं. ९०२८२९१६४५

प्रकाशक:- पैनगंगा पब्लिकेशन रामनगर, मेहकर जि.बुलढाणा

मूल्य केवळ २३० रुपये

***

# गावागावात ग्रंथालये आहेत, आता घराघरात ग्रंथालय व्हावं - लेखक कृष्णात खोत



ज्योतिर्मय साहित्य

**कोल्हापूर** - देशाला स्वातंत्र्य मिळते तसे माणसातील स्वातंत्र्य मिळविण्यासाठी पुस्तके काम करतात. पुस्तके समृद्ध असून ग्रंथ चळवळ वाढविण्यासाठी गावागावात ग्रंथालय आहेत आता प्रत्येक घराघरात ग्रंथालय व्हावं अशी इच्छा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त साहित्यिक, कृष्णात खोत यांनी व्यक्त केली. त्यांच्या हस्ते इचलकरंजी येथे कोल्हापूर ग्रंथोत्सव २०२४ चे उद्घाटन झाले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी अमोल येडगे, इचलकरंजी महापालिका आयुक्त ओमप्रकाश दिवटे, अतिरिक्त आयुक्त सुषमा शिंदे, सहाय्यक आयुक्त विजय राजापुरे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी अपर्णा वाईकर, जिल्हा माहिती अधिकारी सचिन अडसूळ, कोल्हापूर जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ. सुशांत मगदूम, ग्रंथालय संघ कार्यवाहक भीमराव पाटील, आपटे वाचन मंदिराचे अध्यक्षा सुषमा दातार, प्रसाद कुलकर्णी उपस्थित होते.

कृष्णात खोत म्हणाले, लेखक व त्यांचे लेखन खऱ्या अर्थाने आपली, आपल्या समाजाची संपत्ती आहे. समाजाने हिटलरकडे न जाता गौतम बुद्धांकडे जावे. साहित्य हे शांततेचा आवाज मोठा करते. साहित्य, वाचन आणि ग्रंथसंपदेमुळे त्यांचा शेक्सपिअर जगाला कळला, परंतु आपल्या घरात असणारा तुकाराम मात्र अजून कित्येकांना माहित नाही. प्रत्येकाची भाषा, प्रत्येक समाजाची भाषा टिकली पाहिजे. जगातील वेगवेगळे साहित्य आपल्या भाषेत आले पाहिजे तर आपले साहित्य जगाच्या भाषेत भाषांतरित केले पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले.

जिल्हाधिकारी येडगे यांनी या ग्रंथोत्सवामध्ये दोन दिवस चांगल्या कार्यक्रमांचे आयोजन केल्याचे सांगून या ग्रंथोत्सवासाठी विद्यार्थ्यांचाही सहभाग वाढवावा असे सांगितले. विद्यार्थ्यांनी तसेच युवा पिढीने ग्रंथ साहित्याकडे वळणे आवश्यक असून डिजिटल युगात इंटरनेटचा संदर्भ घेण्याचे कमी करून विद्यार्थ्यांनी खऱ्या अर्थाने पुस्तकांचे संदर्भ मोठ्या प्रमाणात वापरणे आवश्यक आहे असे प्रतिपादन त्यांनी केले. यासाठी त्यांच्यात वाचन संस्कृती वाढवणे आता गरजेचे झाले आहे. जिल्हा ग्रंथालय अधिकारी अपर्णा वाईकर यांनी प्रास्ताविक केले. महापालिका आयुक्त ओमप्रकाश दिवटे तसेच इतर मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. सकाळी ग्रंथ पूजन व ग्रंथदिंडी झाली . यावेळी इचलकरंजी शहरातील विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक व ग्रामस्थ यांनी सहभाग नोंदवला.

# साहित्य संमेलनात वाढीव निधीच्या घोषणेची शक्यता, 'जेएनयू'तील मराठी अध्यासनाला मोदींची उपस्थिती पावणार!

ज्योतिर्मय साहित्य

**नागपूर** - मागच्या १८ वर्षांपासून प्रलंबित असलेला दिल्लीच्या जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील (जेएनयू) मराठी भाषेच्या अध्यासन केंद्राचा विषय मार्गी लागण्याची शक्यता आहे. दिल्लीत आयोजित साहित्य संमेलनाच्या उद्घाटनीय सत्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत वाढीव निधीच्या घोषणेसंदर्भात हालचाली सुरू असल्याचे कळते.

जेएनयूमध्ये मराठी साहित्यावरील संशोधन आणि विकासाला गती मिळावी यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या काळात प्रयत्न सुरू झाले. राज्य आणि केंद्रात काँग्रेसचे सरकार असल्यामुळे या विषयाला लगेच मान्यताही मिळाली. त्यासाठी राज्य सरकारने एक कोटी रुपयांचा निधीही मंजूर केला. परंतु, पुढे वाढीव निधीच्या मागणीवरून अध्यासनाचा विषय रखडला. आता या अध्यासनासाठी किमान १० कोटी रुपये मिळावे, अशी जेएनयूची अपेक्षा आहे. विशेष म्हणजे, तामिळ, उडिया, ओडिशा या राज्यांनी आपआपल्या भाषांच्या अध्यासनाचा विषय मार्गी लागावा यासाठी जेएनयूला तत्परतेने निधी पुरवला. महाराष्ट्र सरकारने मात्र अशी तत्परता न दाखवल्याने मागच्या सुमारे १८ वर्षांपासून अध्यासन सुरू होऊ शकलेले नाही.

केवळ तीन दिवसांच्या, करमणूक प्रधान, उत्सवी, व्यासपीठीय अशा सरकारी विश्व साहित्य संमेलनावर १० कोटींचा खर्च करणाऱ्या राज्य सरकारकडे आपल्या भाषेच्या अध्यासनासाठी निधी का नाही, असा प्रश्न साहित्य वर्तुळातून विचारला जाऊ लागल्यानंतर सरकार वाढीव निधी देण्याबाबत गंभीरपणे विचार करीत असल्याची माहिती सूत्रांनी दिली. दिल्लीतील संमेलन २१ ते २३ फेब्रुवारी या काळात होत आहे आणि २७ फेब्रुवारीला 'मराठी भाषा गौरव दिन' आहे. या पार्श्वभूमीवर निधी देतानाच त्याचे राजकीय श्रेयही मिळावे, यासाठी पंतप्रधान मोदी यांच्या उपस्थितीत दिल्लीतील साहित्य संमेलनाच्या उद्घाटनीय सत्रात घोषणा करण्याचे नियोजन सुरू असल्याचे कळते. दरम्यान, याबाबत प्रतिक्रिया मिळवण्यासाठी मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांच्याशी संपर्क साधला असता होऊ शकला नाही.

# विट्यात रविवारी ४३ वे ग्रामीण मराठी साहित्य संमेलन

ज्योतिर्मय साहित्य


**कोल्हापूर** - सांगली जिल्ह्यातील विटा येथे रविवारी, (९ फेब्रुवारी २०२५) ४३ वे ग्रामीण मराठी साहित्य संमेलन होत आहे. भारतमाता ज्ञानपीठ या संस्थेतर्फे संमेलनाचे आयोजन केले आहे. राधा -रामकृष्ण बापट मुक्तांगण वाचनालयाच्या प्रांगणात संमेलन होणार आहे. या संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक डॉ.श्रीपाल सबनीस असणार आहेत. अशी माहिती संयोजक रघुराज मेटकरी यांनी दिली.





यादिवशी सकाळी ९.३० वाजता कवठेमहाकांळ नगरपंचायतचे मुख्याधिकारी अवधूत कुंभार यांच्या हस्ते सरस्वती पूजन करून संमेलनाची सुरुवात होणार आहे. कवी आनंदहरी यांच्या अध्यक्षतेखाली कवीसंमेलन आहे. त्यामध्ये अनेक कवी सहभागी होणार आहेत. दुसरे सत्र दुपारी चार वाजता सुरू होणार आहे. त्याचे उद्घाटन अध्यक्ष आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र शासनाचे डॉ. ओमप्रकाश शेटे करणार आहेत. आमदार डॉ. विश्वजीत कदम हे प्रमुख पाहुणे आहेत. स्वागताध्यक्ष प्राचार्य डॉ. दिनकर पाटील आहेत. तिसऱ्या सत्रात रात्री ८.३० वाजता कथाकथन व संमेलन समारोप आहे. प्रमुख पाहुणे प्रा. सिद्धेश्वर सपकाळ आहेत. प्रा. विश्वनाथ गायकवाड, नागु विरकर, जयवंत आवटे यांचे कथाकथन आहे.

प्रसिद्ध साहित्यिक पद्मश्री पु. ल. देशपांडे यांच्या नावाने उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीचा पुरस्कार प्रा. विश्वनाथ गायकवाड व श्रीमती शकुंतला अण्णा होनमाने व आदर्श शिक्षक पुरस्कार संपत शेळके यांना व ज्ञानोबा बापू काळे उत्कृष्ट वांङ्मय निर्मिती पुरस्कार डॉ. मुरहरी केळे यांना व हौसाबाई ज्ञानोबा काळे उत्कृष्ट वाङ्मय निर्मिती पुरस्कार प्रा. डॉ. श्रुती श्री वडगबाळकर व साहित्यिक द.का.हसमनीस उत्कृष्ट वाङ्मय निर्मिती पुरस्कार प्रा.डॉ. विनोद गायकवाड यांना देण्यात येणार आहे. साहित्यिक सुनील दबडे यांच्या बनगी आणि बिरमुटं कथासंग्रह व साहित्यिक रमेश गायकवाड यांच्या पर्यावरणाचा छोटा रक्षक''एकांकिका संग्रहाचे प्रकाशन यावेळी होणार आहे. संमेलन यशस्वी करण्यासाठीडॉ. ऋषिकेश मेटकरी, वैशाली कोळेकर, अरुण लंगोटे , हर्षवर्धन मेटकरी आदी योगदान देत आहेत. वाचनप्रेमींनी या संमेलनास मोठया संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन कार्यवाह योगेश्वर मेटकरी यांनी केले.



# मी तुमचा राष्ट्रपती कसा होणार


ज्योतिर्मय साहित्य

स्वातंत्र्यसेनानी अच्युतराव पटवर्धन यांचा जन्म ५ फेब्रुवारी १९०५ रोजी अहमदनगर येथे झाला. त्यांचे मुळचे घराणे रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यातील जानशी या गावचे. नोकरी निमित्त त्यांचे आजोबा केशवराव पटवर्धन अहमदनगरला आले. अच्युतरावांचे वडील हरीभाऊ यांचे २१ जानेवारी १९२४ रोजी न्युमोनियाने निधन झाले. अच्युतराव यांना त्यांचे काका सीताराम यांनी लहानपणीच दत्तक घेतल्याने त्यांचे नाव अच्युतराव सीताराम पटवर्धन असे रूढ झाले. १९१७ मध्ये सीताराम पटवर्धन यांच्या निधनानंतर अच्युतराव यांना त्यांची संपत्ती वारसा म्हणून मिळाली. लहानपणापासून हुशार म्हणून नावाजलेले अच्युतराव अहमदनगरच्या शाळेतून मॅट्रीकची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर उच्च शिक्षणासाठी बनारस येथे गेले. ॲनी बेझंट यांच्या सेंट्रल हिंदू कॉलेजमधून एम.ए. झाल्यावर ते युरोपला गेले आणि तेथून परतल्यावर बनारसला अर्थशास्त्राचे प्राध्यापक झाले. त्यांचे वडील हरीभाऊ आणि त्यांना दत्तक घेतलेले वडील सीताराम यांना थिओसोफीमध्ये रस असल्याने बनारस येथील सेंट्रल हिंदू कॉलेजमध्ये घेतलेल्या शिक्षणाने त्यांच्यात अध्ययन, ध्यान आणि संयम यांची आवड निर्माण झाली.

१९३० मध्ये महात्मा गांधी यांनी कायदेभंगाची चळवळ देशभर सुरू करताच, अच्युतराव पटवर्धन यांनी नोकरीचा राजीनामा दिला आणि मुंबईत येऊन ते काँग्रेस कार्यकर्त्यात मिसळले. मुंबईत ते गुप्तपणे बुलेटिन प्रसिद्ध करीत होते. कित्येक महिने पोलिसांना त्यांनी दाद दिली नाही. अखेर त्यांना अटक झाली व नाशिकच्या तुरुंगात त्यांची रवानगी झाली. नाशिकच्या तुरूंगात ते जयप्रकाश नारायण अशोक मेहता, नानासाहेब गोरे आदिंच्या सहवासात आले. युथ लीगचा पाया घालूनच ही तरुण मंडळी तुरुंगातून बाहेर पडली. कायदेभंगाच्या चळवळीत ते प्रथम भूमिगत झाले. त्यानंतर ते अनेकदा स्वातंत्र्य चळवळीत भूमिगत झाले. भूमिगत होण्यात त्यांचा हातखंडाच होता. कायदेभंग चळवळीमध्ये रावसाहेब पटवर्धन व अच्युतराव पटवर्धन या दोन्ही भावानी भाग घेऊन सत्याग्रही तुकड्यांचे नेतृत्व केले.

महात्मा गांधीचे अनुयायी म्हणवणारे अनेकजण कमालीचा बेंगरूळ पोषाख करीत आणि वैयक्तिक जीवनात अतीशय कर्मठपणाने वागत. पटवर्धन बंधूना महात्मा गांधींच्याबद्दल प्रचंड आदर होता, पण पंडीत नेहरू यांच्याप्रमाणेच अच्युतराव रसिक वृत्तीचे असल्यामुळे खादीचे कपडे स्वच्छ आणि नेटके असावेत असा त्यांचा आग्रह असे. विचारात आणि आचारात पंडीत नेहरू, रावसाहेब पटवर्धन, अच्युतराव पटवर्धन आधुनिकतेचे भोक्ते होते. प्रचंड प्रमाणात तरूणवर्ग त्यांच्याकडे आकृष्ट झाला होता.

१९३२ च्या स्वातंत्र्य लढ्यात पुन्हा अच्युतराव यांना तुरुंगवास भोगावा लागला. स्वातंत्र्यलढ्यातील या तुरुंगामध्ये असलेल्या अनेक तरुण नेत्यांमध्ये व कार्यकर्त्यांमध्ये जे वैचारिक मंथन झाले त्यामधूनच समाजवादी पक्षाच्या स्थापनेचा निर्णय घेण्यात आला. या पक्षाच्या संस्थापकांमध्ये आचार्य नरेंद्र देव, जयप्रकाश नारायण, कमलादेवी चट्टोपाध्याय , डॉ. लोहिया,युसुफ



अच्युतराव पटवर्धन

मेहेरअली, अच्युतराव पटवर्धन, एस.एम. जोशी, ना.ग. गोरे यांचा समावेश होता. अच्युतराव पटवर्धन हे यानंतर अखिल भारतीय राजकारणात तळपू लागले. १९३४ मध्ये पंडित जवाहरलाल नेहरू यांनी काँग्रेसची कार्यकारिणी बनवली. त्यामध्ये २९ वर्षाच्या तरुण अच्युतरावांची काँग्रेस वर्किंग कमीटीचे सदस्य म्हणून नियुक्ती झाली होती. एवढ्या तरुण वयात कार्यकारिणीचे सदस्यत्व पटकावण्याचा मान त्यांनीच प्रथम मिळविला. त्यावेळी अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या बैठकीमध्ये अच्युतराव पटवर्धन यांची भाषणे अतीशय प्रभावी होत. त्यांचे व्यक्तिमत्व जितके विलोभनीय होते तितकेच त्याचे वक्तृत्वही प्रसन्न होते. त्यांच्या भाषणात आक्रस्ताळपणा नसे,परंतु ते आपली भूमिका अतीशय खंबीरपणे मांडीत. बिनतोड युक्तीवाद,अचूक आणि मोहक शब्दरचना,आणि विचारांची सडेतोड मांडणी ही त्यांच्या भाषणाची वैशिष्टे असत. बनारसला काही दिवस प्राध्यापक म्हणून केलेल्या कामाचा त्यांच्या बोलण्याच्या शैलीवर परिणाम झालेला असावा. १९३७ मध्ये काँग्रेस निवडणुकीच्या आखाड्यात उतरली. प्रचारासाठी पंडीत नेहरूंनी जो झंझावाती दौरा केला त्यावेळी अच्युतराव पटवर्धन त्यांच्याबरोबर होते. नेहरूंच्या हिंदी भाषणाचा सरस मराठी अनुवाद ते श्रोत्यांना ऐकवीत. या सानिध्यामुळे जनता त्यांना महाराष्ट्राचे जवाहर म्हणून ओळखू लागली. अच्युतरावांमुळे अतीशय प्रभावी वक्ता कांग्रेसला मिळाला. काँग्रेसने मंत्रीमंडळे बनविण्याच्या प्रश्नावर पक्षश्रेष्ठींशी मतभेद झाल्यामुळे अच्युतराव यांनी काँग्रेस वर्किंग कमीटीचे कार्यकारिणी सदस्यत्त्वाचा राजीनामा देऊन काँग्रेस पक्ष सोडला. जयप्रकाश नारायण यांनी समाजवादी विचारांच्या तरुणांची पाटणा येथे



शिरीष चिटणीस

बैठक बोलाविली. आचार्य नरेंद्रदेव यांच्या अध्यक्षतेखाली काँग्रेस समाजवादी पक्षाची ही पहिली पण अनाधिकृत बैठक. तेंव्हापासून अच्युतरावांचा समाजवादी पक्षाच्या कार्यकारिणीत प्रभाव राहिला.

दुस-या महायुद्धाच्या सुरवातीनंतर स्वातंत्र्य आंदोलन होणार हे स्पष्ट दिसू लागले. सुरवातीस राजाजींनी पुणे करारात जी भूमिका मांडली त्याला अच्युतरावांचा कडवा विरोध होता. दुस-या महायुद्धात ब्रिटीशांना स्वातंत्र्याशिवाय सहकार्य देण्यास काँग्रेसने नकार दिला आणि वैयक्तीक सत्याग्रहाचे शस्त्र उपसले. वैयक्तीक सत्याग्रहाच्या काळातही ते अस्वस्थ होते. यावेळी अच्युतरावांना अटक झाली आणि १५ महिने सक्तमजुरी व एक हजार रुपये दंडाची शिक्षा भोगावी लागली. या तुरुंगवासात अच्युतराव पटवर्धन यांनी अशोक मेहता यांच्या सहकार्याने दि कम्युनल ट्रँगल इन इंडिया हे पुस्तक लिहिले. साहित्य क्षेत्रातील अच्युतरावांची दुसरी कामगिरी म्हणजे साप्ताहिक संघशक्ती' हे वृत्तपत्र. परंतु त्यांचे मोठे बंधू रावसाहेब पटवर्धन आणि इतर सहकारीही लुरूंगात गेल्यामुळे ते बंद पडले.

(क्रमशः)

# आवं म्याँडम अव जरा दमान सांगा

''आवं म्याँडम अव जरा दमान सांगा की, लिव्हायला वकुत लागतो बघा. तुम्ही लय भरभर सांगता ब्वाँ लिव्हताना मला लय पळावं लागतयं बगा वहीवर.जरा दमान घ्या की.'' पक्या मँडमना म्हणत होता. मँडम मात्र त्यांच्या एकाच लयी मध्ये मुलांना लिहून देत होत्या, आणि इतर मुले पण गुपचुप लिहून घेत होते. पण पक्या मात्र सगळ्या मुलांच्या मागे मागे पडत होता. त्याचे मित्र पण त्याला हसत होते. मँडम पण सारख सारख ''मी हळू सांगणार नाही. तुम्हीच भरभर लिहा असं म्हणत रहायच्या.

पक्या एवढा लिहिताना मागे का पडायचा?याचा शोध काही लागत नव्हता. पक्या म्हणजे इयत्ता तिसरीच्या वर्गातील एक सामान्य पोरगा होता. पण सामान्य असला तरी तो सगळ्यांचा लाडका होता. त्याच पाठांतर चांगले होते. तो विविध खेळ खेळण्यात माहीर होता. कब्बडी खेळायला लागला तर त्यात त्याची चपळाई मनात भरण्यासारखी होती. धावण्याच्या शर्यतीत तर तो नेहमी पुढे असायचा. कोणत्याही कार्यक्रमात तो हिरीरीने सहभागी व्हायचा. पण अभ्यास आणि लेखन म्हंटल की पक्याचं तोंड पहाण्यासारखं व्हायचं.

पक्यानं एकदा वक्तृत्व स्पर्धेत ही भाग घेतला होता. तेव्हा त्याने आई विषयावर व्दितीय पारितोषिक पण पटकावले होते.असा पक्या सर्व गुण संपन्न असला तरी लेखनात मात्र म्हणावी तशी प्रगती करु शकत नव्हता.

म्याँडम जरा दमान सांगा वं. हे त्याचे नेहमीचे शब्द. तेही एक हात वहीवर व डावा हात मँडमकडे करुन थांबा असा इशारा केल्यासारखा हात वर करायचा.कधी कधी माग पडला तर शेजारच्या मित्राच्या वहीत बघून लिहायचा.कधी मित्रांच्या वह्या घरी नेऊन लिहायचा. त्याचे अक्षर फार खराब होते असे ही नव्हते.त्याचे त्याला व मँडमना वाचता येत होते. माग जरी पडले तरी त्याचा अभ्यास पूर्ण असायचा.

पक्या आणि त्याचे मित्र एका ग्रामीण भागातील जि.प. शाळेत शिक्षण घेत होते. शाळा गावाच्या सुरुवातीलाच होती मस्त झाडं, कौलारू इमारत, मोठ्ठं पटांगण, मोठ्या वर्गखोल्या, व्हरांडा अशी मस्त ऐसपैस पसरलेली शाळा आणि तिचा परिसर होता. उन्हाळ्यात पालकांची थंडाव्यासाठ, दुपारच्या विश्रांतीसाठी गर्दी रहायची असं वातावरण होतं. अशा मुक्त पोषक, पर्यावरणीय, वातावरणात मुलांचा योग्य विकास होत होता.एके दिवशी बदली होऊन एक मास्तर या शाळेत रूजू झाले. मास्तर पस्तीस चाळीशीतीलच होते, व शहरी भागातील होते. ते एकदा पक्याच्या वर्गावर मँडम जागी आल्याने नवीन मास्तर म्हणून पोरं जरा घाबरली होती, पण त्यांच्या एकंदरीत वागण्या बोलण्यातून मुल एकदम ताणरहित होऊन गुरुजींशी सलगी करु लागले.

एके दिवशी गुरुजी मराठी अभ्यास लिहून देताना पक्या एकदम म्हणाला''म्याँडम जरा दमान सांगा की,''त्याच्या लक्षात नाही आले की मँडमची बदली होऊन आता आपल्या समोर गुरुजी आहेत. सगळी मुलं मुली एकदम खो खो करून हसल्या. पक्याची चूक लक्षात आली. तो ही चुकल्यामुळं गालातल्या गालात हसला.

पुन्हा एकदा पक्या म्हणाला,''गुर्जी जरा दमान''तेव्हा गुरुजींनी त्याला पुढे पहिल्या ओळीत बसवलं,आणि लिहिताना ते त्याच्याकडे लक्ष ठेऊ लागले. त्यांना हे लक्षात आले की पक्याचं लिहिनं थोडं विचित्र आहे. अक्षर काढताना तो उलटी सुलटी काढतो.म्हणजे काही अक्षरं खालून वर काढत जातो. जसे आपण ड वरुन सुरू करतो तो मात्र खालून उलटा ड काढायचा. त्यामुळे त्याचं लिखाण तो भरभर करु शकत नाही. गुरुजींना हे समजल्यावर

दत्ता तरलगट्टी सर
मुक्त पत्रकार.
९८८१६२९०४८

पक्याच्या डोक्यात ही चूक आणून दिली. त्याच्या सारख्या आणखीन काही विद्यार्थ्यांना तशीच समस्या होती ती दूर केली.त्यांना तसा सराव त्यांनी त्यांच्याकडून करुन घेऊन त्यांचे लेखन सुधारणा घडवून आणली. पक्या घरी पण जी अक्षरे उलटी काढत होता. त्याचा सराव तो नियमित करु लागला. आता पक्या, ''म्याँडम किंवा गुर्जी दमान सांगा वं'' अस न म्हणता तो इतरांच्या बरोबरीने लेखन करु लागला. पक्या एक चांगला, गुणी, हुशार विद्यार्थी म्हणून नावाजला. हळूहळू सांगा म्हणणारा पक्या पुढे जिल्ह्याचा जिल्हाधिकारी झाला.त्याच्यामुळे त्या जि.प.शाळेची ओळख अख्ख्या जिल्ह्यात झाली. मुलं आता मायबोलीतून शिक्षण घ्यायला जिल्हा परिषद शाळेकडे धाव घेऊ लागली.ग्रामीण भागातील मुलांमध्येही टॅलेंट असतं हे पक्यानं दाखवून दिल्याने पक्याचा प्रकाश साहेब झाला. पक्याचा प्रकाश साहेब होण्यासाठी गुरुजींनी योग्य वेळी योग्य मार्गदर्शन केले. इयत्ता पहिली पासून मुलांना पेन्सिल हाती घेतल्यापासून त्यांना अक्षरांचे योग्य वळणे (स्ट्रोक्स् ) हे समजावून सांगणं किती महत्त्वाचे आहे. हे पक्याच्या



उदाहरणातून समजून घ्यायला हवे,आणि समजून देणे गरजेचे असते. योग्य वळणावर वळणानुसार, योग्य वळणे घेत अक्षरे कोरली/घटवली तर पक्या सारखी अनेक मुलं नक्कीच सुधारतील.आणि पक्या प्रमाणे साहेब होतील.त्यासाठी पक्या आणि कुशल मार्गदर्शक भेटले पाहिजेत.

# मुलांच्या स्क्रीन टाइमला घाला आवर

ज्योतिर्मय साहित्य

मुलांचा वाढता स्क्रीन टाइम ही आजच्या पालकांपुढील खूप मोठी समस्या बनली आहे.अन्न, वस्त्र, निवारा याप्रमाणेच मोबाइल ही माणसाची मूलभूत गरज बनली आहे.आज घरात जेवढी माणसं आहेत तेवढेच मोबाइल पहायला मिळतात.प्रत्येकाला स्वतंत्र मोबाइल असल्याने प्रत्येकाचा स्क्रीन टाइम वेगवेगळा आहे.वाढत्या स्क्रीन टाइममुळे मुलांच्या बौद्धिक आणि शारीरिक विकासावर परिणाम होत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.शारीरिक हालचाली कमी होत असल्याने विविध आजारांचा धोका वाढत आहे.

लहान मुले खात नाहीत म्हणून त्यांच्या हातात मोबाइल दिला जातो.म्हणजे खाण्यासाठी मोबाइलचे अमिष दाखवावे लागते अशी परिस्थिती आहे.जेवताना मुलांनी त्रास देऊ नये, कामात व्यत्यय आणू नये म्हणून लहान मुलांना खेळण्यासाठी मोठी माणसेच हातात मोबाइल देतात.जेणेकरुन काही काळ मुले मोबाइलमध्ये रमतील आणि आपल्याला जरा निवांतपणा मिळेल .खरं तर इथेच आपण मोठी चूक करतो आणि लहान मुलांना मोबाइलच्या आहारी जाण्यास हळूहळू भाग पाडतो. आणि नंतर आपणच तक्रार करतो मुलं आमचं ऐकतच नाहीत. त्यांचा स्क्रीन टाइम वाढला आहे.

जगातील अनेक देशात मुलांचा वाढता स्क्रीन टाइम ही मोठी समस्या बनली आहे. त्यामुळे मुलांची एकाग्रता कमी होते.अभ्यासात लक्ष लागत नाही. जेवणाकडेही नीट लक्ष दिले जात नाही. एकंदरीत मुले स्वमग्न बनतात. मोबाइल आणि आपल्याच विश्वात रममाण होतात.त्यांच्या सामाजिक आणि भावनिक विकासाच्या दृष्टीने हे धोकादायक आहे.



विद्यार्थ्यांशी हितगुज

लक्ष्मण जगताप,
बारामती
संपर्क : ९४२३२ ४९९९६

स्वीडन या देशाने मुलांच्या स्क्रीन टाइमबाबत मार्गदर्शक तत्वे जारी केली आहेत. दोन वर्षापर्यंतच्या मुलांना नो स्क्रीन टाइम असा नियम केला असून वेगवेगळ्या वयोगटातील मुलांना स्क्रीन टाइम ठरवून दिला आहे. तेवढाच वेळ मुलांनी स्क्रीनसाठी द्यायचा अशा सूचना पालकांना दिल्या आहेत. मुलांच्या दृष्टीने अतिशय चांगला असा हा निर्णय असून जगभरातील अनेक देशांनी याचे अनुकरण करणे आवश्यक आहे.

जगभरातील पालकांनी आता वेळीच सावध होण्याची गरज आहे.मुलांना स्क्रीन टाइमपासून वाचवले तरच ही निरागस बालके शरीराने आणि मनाने सुदृढ बनतील. अन्यथा या मुलांच्या आरोग्याच्या गंभीर समस्या निर्माण होतील.यासाठी पालक म्हणून प्रत्येकाने दक्ष राहून आपल्या मुलांचा स्क्रीन टाइम किती आहे ? तो कसा कमी करता येईल? मुलांना अन्य गोष्टीत कसं गुंतवून ठेवता येईल ? याचा विचार करावा. आणि त्यादृष्टीने पर्याय शोधावेत.जेणेकरुन मुले स्क्रीनपासून दूर राहतील.

मैदानावरील खेळ, चित्रे, कागदकाम, नृत्य गायन, वादन अशा आनंद देणाऱ्या आणि विविध कौशल्ये वृद्धींगत होणाऱ्या गोष्टीत मुलांची गोडी कशी वाढेल यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत.




हे जनरल संपादक व प्रकाशक श्री.संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559